


दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● मंगळवार २६ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २२३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका,गाव पातळीवर वार्ताहार/पत्रकार/जाहिरातदार प्रतिनिधी नेमणे आहे.

दैनिक वादळ वार्ता

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

** पात्रता **

१. समाजसेवेची आवड २. जनसंपर्क ३. स्मार्ट फोन असणे आवश्यक ४. सोशल मीडियाचा वापर करता येणे

संपर्क-९४२२६६००७७

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

## केंद्र शासनाने इथेनॉल धोरणाचा पुर्नविचार करावा मा.आ.श्री. प्रकाशदादा सोळंके यांचे प्रतिपादन



**वादळवार्ता/माजलगाव**

माजलगाव (बातमीदार) केवळ साखर उत्पादनावर शेतकऱ्यांना एफ.आर.पी प्रमाणे भाव देणे कारखानदारांना शक्य होत नसल्याने केंद्र शासनाने इथेनॉल निमीतीला घातलेल्या बंदी निर्णयाचा फेर विचार करुन हि बंदी मागे घ्यावी अशी अपेक्षा व मागणी साखर संघाचे उपाध्यक्ष तथा लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक आ. प्रकाशदादा सोळंके यांनी कारखान्याच्या ३२ व्या उस गाळप हंगाम सांगता समारंभ प्रसंगी बोलताना केली. तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा सन २०२३-२४ च्या ३२ व्या उस गाळप हंगामाचा सांगता समारंभ दि.२३ मार्च रोजी झाला. यावेळी कारखान्याचे मार्गदर्शक तथा साखर संघाचे उपाध्यक्ष आ. प्रकाशदादा सोळंके यांच्या शुभहस्ते विधीवत गव्हाण पुजन करून या उस गळीत हंगामाची सांगता करण्यात आला. याप्रसंगी उस वाहतूक करणाऱ्या बैलगाडी चालक, ट्रक. मिनी ट्रॅक्टर चालक यांच्या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आ. सोळंके म्हणाले की. केवळ साखरेचे उत्पादन करुन शेतकऱ्यांना एफ.आर.पी. प्रमाणे भाव देणे शक्य नाही. त्यामूळे कारखानदारांनी कारखान्याच्या माध्यमातून उपपदार्थ निर्मातीचे प्रकल्प उभे केले उदा. इथेनॉल निर्माती. को. जनरेशन आदि उपपदार्थ निमीतर्ती प्रकल्प कार्यान्वीत करून त्यातून मिळणाऱ्या रक्कमेतून शेतकऱ्यांना जास्तीचा भाव देण्याचा प्रयत्न केला जात होता मात्र यामूळे साखरेचे उत्पादन कमी होत असल्याचे केंद्र शासनाच्या निदर्शनास आल्याने केंद्र शासनाने दि.७ डिसेंबर २०२३ पासुन सर्वच साखर कारखान्यातील इथेनॉल निर्मातीस बंदी घातली. त्यामूळे कुठल्याच साखर कारखान्यात इथेनॉल निर्मीती होत नाही. पुर्वी आपल्या कारखान्याची ४५ हजार लिटर इथेनॉल निर्मीतीचा प्रकल्प होता मात्र गेल्या वर्षी जवळपास १०० कोटी खर्च करून इथेनॉल विस्तारीकरण करून १ लाख लिटर क्षमतेचा प्रकल्प कार्यान्वीत केला आणि इथेनॉल बंदीचा निर्णय आला त्यामूळे आपल्या कारखान्याचे खुप मोठे नुकसान झालेले असून, आता कमाल एफ.आर.पी. प्रमाणे भाव देणे शक्य होत नसल्याने केंद्र शासनाने इथेनॉल बंदीचा घेतलेला निर्णयाचा फेरविचार करून इथेनॉल निर्मातीस परवानगी द्यावी अशी अपेक्षा वजा मागणी आ.प्रकाशदादा सोळंके यांनी व्यक्त केली. पुढे म्हणाले की, मागच्या वर्षीचे १५० रुपये देणे बाकी असून ते ऊस उत्पादक यांना लवकरच देण्यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. सन २०२३-२४ या गाळप हंगामामध्ये एकुण १६८ दिवसामध्ये ६.४५ लाख मे. टन उसाचे गाळप करून सरासरी १०.२९% साखर उताऱ्याने ४.९७ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केलेले असून या बरोबरच १.७० कोटी लिटर्स इथेनॉलचे उत्पादन घेवून ३.५८.७१.६०० युनिट विज राज्य विज वितरण कंपनीस निर्यात केली आहे. कार्यक्रमास कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, बिगर सभासद, उस उत्पादक शेतकरी, कार्यकारी संचालक श्री. आर. सी. बडगुजर व सर्व खाते उपखातेप्रमुख, कर्मचारी आणि कामगार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार संचालक श्री. छगनराव जाधव यांनी केले.

## प्रकाश आंबेडकरांच ठरलं, उमेदवारी अर्ज भरण्याची तारीख जाहीर

**वादळवार्ता/दिल्ली**

वंचित बहुजन आघाडी महाविकास आघाडीसोबत मिळून लोकसभेची निवडणूक लढणार की, स्वतंत्र त्या बद्दल संभ्रम कायम आहे. प्रकाश आंबेडकर हे वांरवार आपली नाराजी बोलून दाखवतायत. “आमच्या मागणीला फार काही प्रतिसाद मिळाला नाही. आम्हाला कुठेतरी सामावून घ्यायच म्हणून त्यांचा प्रयत्न चालू आहे. त्यांचं डिसीजन झालेलं नाही. आमचाही निर्णय झालेला नाही. मविआमध्येच काही मतदार संघांबाबत मतभेद आहेत. काँग्रेसने उमेदवार यादी जाहीर केली. पण मतभेद असलेल्या मतदारसंघातील उमेदवार जाहीर केलेले नाहीत. काही मतदारसंघ सेनेने क्लेम केले आहेत” असं प्रकाश आंबेडकर म्हणाले. “त्यांचं ठरलं ते आमच्या बरोबर बैठक करणार असतील, तर आम्ही सुद्धा तयार आहोत” असं प्रकाश आंबेडकर म्हणाले. संजय राऊत यांनी विधान केलं की, तुम्ही युती तोडल्याची घोषणा केली हे दुर्दैवी आहे. “मी मविआला त्यांच्या चार जागा परत करतोय. ते चार जागा बोलतात. पण बैठकीत अकोला आणि उर्वरित दोन जागा ऑफर केल्या. मविआचा 15 जागांचा तिढा अजून संपत नाहीय, तर मी कुठे जागा मागणार?” असं प्रकाश आंबेडकर म्हणाले. पूर्व विदर्भात उमेदवारी अर्ज भरण्याची तारीख जवळ आलीय. त्यावर प्रकाश आंबेडकर म्हणाले की, “ज्यांचा क्रिमिनल रेकॉर्ड आहे, त्याला फॉर्म भरायला वेळ लागतो. ज्याचा असा कुठला रेकॉर्डच नाही, त्याचा फॉर्म दोन तासात भरुन होतो” “आम्ही जे उमेदवार फायनल केलेत, त्यांचा रेकॉर्ड पाहिलाय. 27 तारखेला मी अकोल्यातून फॉर्म भरणार.

## आज मराठा समाजाची महत्वाची बैठक आयोजित केली आहे.

**वादळवार्ता/सराटी**

लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीकडून अद्यापही उमेदवार निश्चित झाला नाही, दररोज नवीन नवीन चर्चा पाहायला मिळते, कधी अजित पवार गट, कधी भाजप तर कधी रासप अशा केवळ चर्चा सुरू आहे. राज्यात महाविकास आघाडी आणि महायुतीचे जागावाटप अजूनही रखडले आहे. शिवसेना उबाठाच्या उमेदवारांची यादी आज जाहीर होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे अजित पवार गटाच्या आमदारांची आज पुण्यात बैठक होत आहे. शिवाजी आढळराव पाटील आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहे. कल्याण लोकसभेत शिंदे पुत्राविरुद्ध ठाकरे गटाला उमेदवार आयातीची वेळ आली आहे. लोकसभा निवडणुकीबाबत आज मराठा समाजाची महत्वाची बैठक आयोजित केली आहे.



## सूर्य आग ओकणार; राज्यातील तापमान वाढणार, हलक्या पावसाची शक्यता

**दैनिक वादळ वार्ता प्रतिनिधि.**

गेल्या तीन, चार दिवसांपासून मार्च महिन्यात उन्हाचा चांगला कडाका जाणवू लागला आहे. आता होळीनंतर त्यात आणखी वाढ होणार आहे. हवामानातील बदलामुळे या आठवड्यात राज्यातील अनेक शहरांचे तापमान ४० अंश सेल्सिअसवर जाणार आहे. विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात आताच तापमान ४० अंश सेल्सिअसवर पोहचले आहे. यंदा देशात मार्च आणि एप्रिल महिना सर्वात जास्त उष्णतेचा असणार आहे, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. तापमान वाढीबरोबर राज्यात हलक्या पावसाची शक्यताही आयएमडीने व्यक्त केली आहे.

विदर्भ, मराठवाड्यात तापमान वाढले

राज्यात तापमानात वाढ झाली आहे. विदर्भ मराठवाड्यात तापमान मोठ्या प्रमाणात तापमान वाढले आहे. वर्धा, सोलापूर, अकोला जिल्ह्यात सर्वाधिक तपमानाची नोंद झाली. राज्यात सर्वाधिक तापमान मालेगाव शहरात होते. मालेगावात ४०.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. यवतमाळचे तापमान ४० अंशापेक्षा जास्त होते. ब्रम्हपूरी, वर्धा, नागपूर, जळगाव शहरातील तापमान ३९ अंशावर पोहचले होते.

२८ मार्चनंतर वातावरण बदलणार, पावसाची शक्यता



विदर्भात सध्या मोठ्या प्रमाणात तापमानात वाढ झाली आहे. वर्धा, अकोला, अमरावती आणि बुलढाणा जिल्ह्यात पारा ४० शी पार गेला आहे. २८ मार्चनंतर राज्यात वातावरण ढगाळ राहणार आहे. तर काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. पुढील काही दिवस तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. राज्याचे हवामान कोरडे राहील. २८ नंतर ढगाळ हवामान वाढण्याची शक्यता आहे.

## लोकसभा निवडणूक

### शिवतारेंची शरद पवार-अजित पवारांवर जहरी टीका;



बारामती लोकसभा निवडणूक लढण्याची घोषणा शिवसेनेचे नेते विजय शिवतारे यांनी घेतली. त्यानंतर त्यांनी विजय शिवतारे यांनी आज महत्त्वाची बैठक बोलावली होती. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विजय शिवतारे यांनी ही बैठक बोलावली होती. मुंबईत एकनाथ शिंदे यांच्या भेटीनंतर शिवतारे यांनी आज पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. शिवसैनिक, पदाधिकारी यांच्यासह सरपंच आणि उपसरपंच देखील बैठकीला उपस्थित होते.

### सातव्यांदा पवारांना भेटलो आता:; कराळे गुरूजीं



नितेश कराळे गुरुजी आज पुन्हा एकदा शरद पवार यांच्या भेटीला पोहोचले. मागील आठवड्यात कराळे गुरुजी यांनी शरद पवार यांची भेट घेतली होती. वर्धा लोकसभा जागेसाठी कराळे गुरुजी इच्छुक आहेत. शरद पवार यांनी जर आदेश दिला तर ही निवडणूक लढवणार अशी प्रतिक्रिया कराळे गुरुजी यांनी मागच्या आठवड्यात दिली होती. त्यानंतर आज पुन्हा एकदा पुण्यात ही भेट झाली.

### प्रकाश आंबेडकरांनी एकतर्फी युती तोडल्याची घोषणा केली



प्रकाश आंबेडकर यांनी एकतर्फी युती तोडल्याची घोषणा केली हे दुर्दैव आहे. दोन नेत्यांमध्ये चर्चा होणं गरजेचं होतं. युती करताना चर्चा झाली. तर आपण दूर होताना सुद्धा एकत्रित चर्चा झाली असती तर ती आपल्या राज्याच्या राजकीय संस्कृतीला धरून झालं असतं पण दुर्दैवानं तसं झालं नाही. प्रकाश आंबेडकरांसोबत असलेली युती ही राजकीय नाही तर भावनिक विषय आहे. आम्हाला खात्री आहे की प्रकाश आंबेडकर हे त्यांच्या निर्णयाचा फेरविचार करतील, असं संजय राऊत म्हणाले. संजय राऊतांनी काही वेळाआधी मुंबईत पत्रकार परिषद घेतली. यात त्यांना वंचितसोबतच्या आघाडीबाबत त्यांना प्रश्न विचारला. तेव्हा त्यांनी स्पष्ट भाष्य केलं.

## भेसळयुक्त दूध व दूध संकलन केंद्रावर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयात माहिती द्यावी लागणार

**दैनिक वादळ वार्ता**
**सिन्नर/सुरेश इंगळे**

सिन्नर तालुक्यातील पांगरी येथील सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब बैरागी यांनी काही दिवसापूर्वी तालुक्यातील दूध संकलन केंद्राकडे दूध देणाऱ्या व संकलन केंद्राकडून पुढे पाठवण्यात येणाऱ्या दुधाची माहिती हे स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयात देण्याची मागणी निवेदनाद्वारे तहसीलदारांना केली होती. त्यानुसार तहसीलदारांनी संकलन केंद्राकडून माहिती घेण्याच्या सूचना ग्रामपंचायतीला केल्या होत्या बैरागी यांनी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदनात संपूर्ण जिल्ह्यामध्ये या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची मागणी केली होती. त्यावर जिल्हा अधिकाऱ्यासह जिल्हा परिषदेने तालुक्यातील सर्व पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना तशा सूचना दिल्या होत्या. परंतु त्यावर अंमलबजावणी होत नसल्यामुळे बैरागी यांनी पांगरी येथे उपोषण करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते, सुरुवातीला प्रशासनाने त्यांच्या उपोषणाकडे पाठ फिरवली होती तरीदेखील त्यांनी तहसीलदार जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेकडे यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू केला होता अखेर त्यांच्या लढ्याला यश आले असून आता जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेने दूध संकलनाची माहिती ग्रामपंचायत कार्यालयाकडे न देणाऱ्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिला आहेत त्यामुळे बैरागी यांच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## संपादकीय

# उन्हाळा झालाय सुरु, जाणून घ्या या सीजनमध्ये केळी खाण्याचे फायदे काय?

वर्षाचे बारा महिने बाजारात उपलब्ध असलेले आणि सर्वाधिक विकले जाणारे फळ म्हणजे केळी. पण तुम्हाला माहीत आहे का की हे साधे दिसणारे फळ केवळ चवीसाठीच नाही तर आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. या ऋतूमध्ये केळीचे सेवन केल्याने अनेक आजारांपासून दूर राहता येते. मॅग्नेशियम, पोटॅशियम, व्हिटॅमिन बी6 आणि इतर अनेक पोषक तत्वे केळीमध्ये आढळतात जे पचन आणि हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले असतात. केळी खाल्ल्याने तुमच्या आरोग्यासाठी कोणते फायदे होतात ते जाणून घेऊया.

पचनक्रिया सुधारते : उन्हाळ्यात लोकांना पचनाच्या समस्या येतात. अशा स्थितीत या ऋतूत



केळीचे सेवन केल्यास पचनक्रिया चांगली राहते. पचनक्रिया सुधारून तुम्ही अनेक गंभीर आजारांना बळी पडण्यापासून वाचता. त्यामुळे रोज केळीचे सेवन करणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

लूज मोशनमध्ये फायदेशीर : या ऋतूत उष्णतेमुळे लोकांना लूज मोशनचा त्रासही होतो. अशा परिस्थितीत केळीचे सेवन केल्याने त्यांना तात्काळ आराम मिळू शकतो. काळे मीठ मिसळून केळी खाल्ल्यास आराम मिळेल. यासोबतच केळीसोबत साखरेचे काही दाणे खाल्ल्यानेही तुम्हाला फायदा होईल.

रक्त पातळ ठेवते: केळी शरीरातील रक्त पातळ ठेवण्यास मदत करते. केळी रक्ताभिसरण देखील सुधारते. केळ्यामध्ये मॅग्नेशियम असते ज्यामुळे रक्तातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी होते. कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी झाले की रक्तवाहिन्यांमधील रक्ताभिसरणही सुरळीत होते.

बद्धकोष्ठतेमध्ये फायदेशीर : केळीचे सेवन बद्धकोष्ठतेच्या रुग्णांसाठी संजीवनी औषधी वनस्पतीसारखे आहे. याचे सेवन केल्याने बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून आराम मिळेल. यासाठी केळीसोबत दूध प्या. रोज रात्री झोपण्यापूर्वी याचे सेवन केल्यास बद्धकोष्ठतेवर फायदा होतो.

# साक्षात्कारी आणि निर्भीड संत कवी!

(संतश्रेष्ठ तुकाराम महाराज बीज विशेष.)

संत तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भीड संत कवी होते. वेदान्त तुकोबांच्या अभंगवाणीतून सामान्य जनांपर्यंत प्रवाहित झाला. अभंग म्हटला की तो फक्त तुकारामाचाच एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगांना मिळाली. संत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग, हे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान द्योतक आहेत. वारकरी, ईश्वरभक्त, साहित्यिक, अभ्यासक व सामान्य रसिक आजही त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतात. त्यांचे अभंग खेड्यांतील अशिक्षित लोकांच्याही नित्य पाठांत आहेत. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर संकलित लेखातून ज्ञानवर्धक ही माहिती.... संपादक

संत तुकाराम हे इ.स.च्या सतराव्या शतकातील एक वारकरी संतकवी होते. त्यांचा जन्म देहु या गावात वसंत पंचमीला-माघ शुद्ध पंचमीला झाला. पंढरपूरचा विठोबा हे तुकारामांचे आराध्यदैवत होते. तुकारामांना वारकरी संत जगद्गुरू म्हणून ओळखतात. संत वारकरी संप्रदायातल्या प्रवचन व कीर्तनाच्या शेवटी "पुंडलीक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, जगद्गुरू तुकाराम महाराज की जय!" असा जयघोष करतात. जगद्गुरू तुकाराम लोककवी होते.

"जे का रंजले गांजले!
त्यासी म्हणे जो आपुले,
तोचि साधू ओळखावा!
देव तेथेची जाणावा!"

अशा प्रकारचे अभंग संत तुकाराम महाराजांनी जनसामान्यांना सांगून ईश्वर भक्तीचा सुगम मार्ग दाखवला. संत वारकरी संप्रदायाची अखंड परंपरा त्यांनी निर्माण केली. सतराव्या शतकामध्ये सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवणारे सुधारक संत म्हणून तुकाराम महाराजांचा उल्लेख केला जातो. तुकाराम महाराज वास्तववादी निर्भीड आणि वेळप्रसंगी समाजातील दांभिकपणावर रोखठोक शब्दांमध्ये प्रहार करणारे संत होते. महाराष्ट्राच्या भूमीमध्ये या काळात अनागोंदी निर्माण झालेली होती. अशा काळात त्यांनी आपल्या साहित्यातून व कीर्तनांतून समाजाला अचूक मार्गदर्शन करण्याचे कार्य केले. संत तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भीड संत कवी होते. वेदान्त तुकोबांच्या अभंगवाणीतून सामान्य जनांपर्यंत प्रवाहित झाला. अभंग म्हटला की तो फक्त तुकारामाचाच एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगांना मिळाली. संत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग, हे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान द्योतक आहेत. वारकरी, ईश्वरभक्त, साहित्यिक, अभ्यासक व सामान्य रसिक आजही त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतात. त्यांचे अभंग खेड्यांतील अशिक्षित लोकांच्याही नित्य पाठांत आहेत.

"शुद्ध बीजा पोटी,
फळे रसाळ गोमटी!"

भागवत धर्माचा कळस होण्याचे महद्भाग्य त्यांना लाभले. महाराष्ट्राच्या हृदयात अभंगरूपाने ते स्थिरावले आहेत. त्यांच्या अभंगांत परातत्त्वाचा स्पर्श आहे. मंत्रांचे पावित्र्य शब्दकळेत पाझरते. त्यांची प्रत्यक्षानुभूती त्यांच्या भावकाव्यात आहे. त्यांच्या काव्यातील गोडवा व भाषेची रसाळता अतुलनीय आहे. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगलेखनाबरोबरच गवळणीही रचल्या आहेत. म्हणून...

"संतसमागमी धरावी आवडी|
करावी तातडी परमार्थाची||"

संत तुकारामांच्या अभंगाचा अनेकांनी अनेक अंगानी अभ्यास करून त्यांचे सौंदर्य उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. महाराजांची गाथा ही अखंड ज्ञानाचा स्रोत म्हणून जनसामान्यांच्या मुखांमध्ये कायम आहे. गाथा बुडवली म्हणणाऱ्यांना जनसामान्यांच्या तोंडून मुखोद्गत अभंग ऐकून गाथा जिवंत असल्याचा प्रत्यक्ष अनुभव झाला. इंद्रायणी नदीच्या काठावर लाखोंचा जनसमुदाय गाथेतील अभंग म्हणू लागले यावेळी तुकाराम महाराजांना जाणीव झाली की आपले अभंग, आपली गाथा बुडालेली नाही. तर ती जनसामान्यांच्या मुखांमध्ये अखंड जिवंत आहे. आपल्या कार्याची ही खरी यथोचित पावती आहे. खऱ्या अर्थाने संत तुकाराम हे या काळातील लोक संत होते. बहुजन समाजाला जागृत करून देवधर्म यासंबंधी मते लोकांना पटवून देण्यामध्ये ते यशस्वी ठरले. देव धर्मातील अनागोंदी त्याचप्रमाणे भोळ्या समजुती प्रयत्नपूर्वक नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. समाजमनावरील अंधश्रद्धेचा पगडा दूर करून लोकांना नवा धर्म, नवी भाषा देण्याचं काम संत तुकारामांनी केले. संत तुकारामांचे धर्मक्रांतीचे समाज प्रबोधन आजही समाजाला मार्गदर्शक ठरलेले आहे. त्यांचे अभंग मानवी जीवनाला उपकारक ठरले आहेत लौकिक अर्थाने संत तुकाराम हे आठव्या पिढीतील नायक होते. ज्ञानदेवांनी रचलेल्या भक्ती चळवळीला खऱ्या अर्थाने कळसास नेण्याचे काम हे संत तुकारामांनी केलेले आहे.

"काहो दादुनि होता वेडे|
देव आहे तुम्हां पुढे||"

करुणा भाकत सत्याचे चिंतन केले, त्यावेळी त्यांची सर्व देखभाल आवलीने केली. संत तुकारामांनी स्वतःचा संसार सुखाचा करण्यापेक्षा जगाच्या कल्याणासाठी कीर्तनातून अभंगवाणी रचली, लौकिकार्थाने मायाजालात गुंतले नाहीत. देहूला संत तुकाराम महाराज जेथून वैकुंठाला गेले, त्या स्थानावर नांदुरकीचे एक झाड आहे. तुकाराम बिजेला बरोबर दुपारी १२:०२ वाजता तुकाराम वैकुंठाला गेले, त्या वेळी हा नांदुरकीचा वृक्ष प्रत्यक्ष हलतो, असे सांगितले जाते. संत तुकाराम महाराज हे देहू या गावी जन्मले. संत तुकाराम महाराजांना "जगद्गुरु" असे संबोधले जाते. जगद्गुरु तुकाराम महाराज हे सदैव हरिनामात गढलेले असायचे. होळीनंतर लगेच दुसऱ्या दिवशी "तुकाराम बीज" हा दिवस येतो. याच दिवशी जगद्गुरु तुकाराम महाराज हे नांदुरकी वृक्षाच्या छायेखाली ध्यानस्त बसून सदेह वैकुंठधामाला गेले. असे सनातनी संतांचे मत आहे, तर पुरोगामींचे मत आहे, की आजवर सदेह वैकुंठाला कोणीच गेला नाही, त्यांची हत्या करून त्यांचा मृतदेह गायब करण्या आला अन् तसा बनाव करण्यात आला. वैकुंठधाम म्हणजे साक्षात "श्री हरि भगवान विष्णू" यांचे धाम होय. जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या नावातच राम आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या एक युगप्रर्वतक महापुरुषाने संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे आशीर्वाद घेऊन आपल्या कार्याला सुरुवात केली होती. यामुळे तुकाराम महाराजांना जगद्गुरु असे संबोधले जाते, ते योग्यच आहे.

"तुका सांगे मूढ जना!
देव देहीच पहाना!!"

!! तुकाराम बीज निमित्त जगतवंद्य जगद्गुरु संतशिरोमणी तुकाराम महाराजांना कोटी कोटी विनम्र अभिवादने आत्मिक स्मरण !!

-संकलन व शब्दांकन-
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चौक, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

# नितीन गडकीरीनी दिला आपल्याच मुलाला राजकीय सल्ला

गेल्या 10 वर्षात नागपूरात 1 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणली. ही फक्त रील आहे खरा सिनेमा अजून बाकी आहे... मला चिंता नाही. माझ्या मुलाला राजकारणात आणयचं म्हणून... माझ्या मुलांना सांगितलंय की, माझ्या जीवावर राजकारणात यायचं नाही. राजकारणात यायचं असेल तर भींतीवर पोस्टर लावावं लागेल. शून्यातून उभं राहावं लागेल. लोकांमध्ये जावून काम करावं लागेल, असं मी माझ्या मुलांना सांगतो. माझ्या राजकीय कारकीर्दीवर भाजपच्या कार्यकर्त्यांचा अधिकार आहे. लोकांनी मला उभं केलंय आणि लोकांसाठीच मी काम करतो, असं गडकरी म्हणाले. "तेव्हा ते संभ्रम निर्माण करतात" कोवीड काळात 100 कोटी रुपयांचं कोवीड साहित्य मी आंध्रप्रदेशमधून 47 हजार रुपयांत दिलं. जात – पात न बघता मी सगळ्यांना मदत केली. मी याआधीही ताजबागेत सांगितलंय की, वोट देणार त्यांच पण काम करणार जो नाही देणार त्याच पण काम करणार आहे. ज्यांनी आणीबानी आणली ते आमच्यावर संविधान तोडणार अशे आरोप करतात. लोकांना मनवू करू शकत नाहीत तेव्हा संभ्रम निर्माण करतात, असं नितीन गडकरी म्हणाले.



विरोधकही कौतुक करतात- गडकरी

एकेकाळी गाडी नव्हती. एकाला अध्यक्ष केल कारण त्याच्याकडे ॲबॅसिटर कार होती. आता एवढ्या गाड्या झाल्या की रस्ता बंद होतो. लाखो कार्यकर्त्यांच्या बलिदानामुळे आम्हाला आज हा दिवस पहायला मिळाले. अरुणाचलमध्ये नागपूरच्या नागरिकांकडून टॅक्सी वाल्यांनी पैसे घेतले नाहीत. कारण रस्ता नितीन गडकरींनी बनवला. लोकसभा अध्यक्षांनी मला फोन करून लोकसभेत बोलवलं. लोकसभेत विरोधी पक्षाच्या 75 खासदारांनी माझी प्रशंसा केली. सोनिया गांधी,

# ज्योती ताईना उमेदवारी मिळाल्यास पाठिंबा देण्याबाबत बाळासाहेबांकडे आग्रह धरू –अशोक हिंगे

**वादळवार्ता/बीड**
महाविकास आघाडी कडुन ज्यातीताई विनायकराव मेटे यांना उमेदवारी मिळाल्यास त्यांना पाठिंबा देण्याबाबत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या कडे आग्रह धरू अशी माहिती वंचित चे मराठवाडा अध्यक्ष अशोकराव हिंगे पाटील यांनी दिली आहे.





ते पुढे म्हणाले कि भाजपला रोखण्यासाठी महाविकास आघाडी मधे जाण्याची पुर्ण मानसिकता बाळासाहेब आंबेडकर यांची होती परंतु महाविकास आघाडी घ्या नेत्यांच्या अडेलतट्टू धोरणामुळे आमचा समावैश होईल का ते माहीत नाही परंतु जर महाविकास आघाडी कडुंन ज्योतीताई विनायकराव मेटे यांना उमेदवारी जाहीर झाली तर वंचित चा पाठिंबा देण्या बाबत आम्ही आग्रह धरणार आहोत. मेटे साहेबांचं पुर्ण जिवन संघर्ष मय होत. मराठा आरक्षणासाठी त्यांचा लढा कायम चालु होता. मराठा आरक्षणासाठी च्या बैठकीला जात असताना झालेल्या अपघातात त्यांचा अकाली मृत्यु झाला.ही हळहळ बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या मनात आहे. बाळासाहेब आंबेडकर यांच्याशीही त्यांचे स्नेहाचे संबंध होते.

महाविकास आघाडी ने ज्योती ताईंना उमेदवारी दिल्यास आम्ही त्यांच्या विजयासाठी बाळासाहेब कडे पाठिंबा देण्याबाबत आग्रह धरणार आहोत. व ते ही आमच्या भावनांचा मान ठेवतील. हिच मेटे साहेबांना श्रद्धांजली ठरणार आहे.

# मनुष्याच्या प्रगतीसाठी धम्मसंस्कृतिचे पालन करा - भिक्खु धम्मशिल थेरो




वादळवार्ता/बीड
फाल्गुन पौर्णिमेनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी संस्थेचे सचिव पुज्य भंते धम्मशिल थेरो यांनी सांगितले की,प्रत्येक व्यक्तीने वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून आपली मुले मुली संस्कारीत करणे गरजेचेआहे. त्याचबरोबर धम्मसंस्कृती जोपासतांना वेळेचं भान असावं असेही त्यांनी सांगितले.आजची पिढी मोबाईलमुळे भरकटत आहे.अशी खंत व्यक्त करुन पालकांनी आपल्या मुला-मुलीकडे वेळीच लक्ष देण्याची गरज आहे असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. शरद सदाफुले (र.भ.अट्टल महाविद्यालय,गेवराई)यांनी आपल्या खास शैलीत सामाजाची दशा व दिशा या विषयी आपल्या मार्मिक कथेच्या माध्यमातून मांडणी केली. यावेळी इंजि.संदीप औताने यांनी सांगितले की,बाबासाहेबांनी आम्हाला स्वाभिमान दिला.तोच स्वाभिमान जतन करुन पुढच्या पिढीसाठी आदर्श निर्माण केला पाहिजे असे सांगितले.

महाराष्ट्र शासणाने अभियंता या पदासाठी घेतलेल्या परीक्षेत इंजि.अभिनव भिमज्ञ वेडे यांची सार्वजनिक बांधकाम विभाग लातूर येथे अभियंता म्हणून निवड झाल्यामुळे त्यांच्या सत्काराचेही आयोजन करण्यात आले होते.

यावेळी दहा दिवस केशवपन करुन भिक्षुणी म्हणून अनुभव घेतलेल्या आयु.सोनाली संदीप गायकवाड यांचाही सत्कार करण्यात आला.

भोजन दान दाते आयु.निता भोसले व परिवाराचे अभिनंदन करून सत्कार करण्यात आला.

सर्व प्रथम भंते भिक्खु धम्मशिल थेरो व भिक्खु धम्मसेवक यांच्या हस्ते महापुरुषांची पुष्प पुजा करण्यात आली. क्षमा-शिल-याचनेनंतर त्रिसरण -पंचशील व बुध्द पुजा वंदना घेण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डा[illegible].नामदेव शिनगारे यांनी केले तर तर आभार आयु.भास्कर सरपते यांनी मानले.या कार्यक्रमाला प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्थेचे सर्व सदस्य व पंचक्रोशितील उपासक, उपासिका बहूसंख्येने उपस्थित होते.

# ह भ प गोविंद घरत महाराज आनंदनगर भूषण पुरस्काराने सन्मानित.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**
उरण शहरातील आनंद नगर येथे दरवर्षी होळी सण मोठया उत्साहात साजरी केली जाते. याहीवर्षी हा सण मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.आनंद नगर होळी उत्सवाच्या निमित्ताने दिला जाणारा प्रतिष्ठेचा आनंद नगर भूषण पुरस्कार यावेळी हरिभक्त परायण गोविंद घरत महाराज यांना देण्यात आला.स्मृतीचिन्ह शाल व श्रीफळ देऊन आनंद नगरचे अध्यक्ष दीनानाथ ठाकूर, सेक्रेटरी पत्रकार शेखर



पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. गोविंद महाराज यांनी आजपर्यंत ५४ वर्ष भजन कीर्तन दिंडी पदयात्रा केली आहे. ते उरण तालुका वारकरी संप्रदायाचे अध्यक्ष आहेत. त्यांना रायगड भूषण पुरस्कार , ज्ञानगंगा पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळाले आहेत.गोविंद घरत महाराज यांच्या वारकरी संप्रदायाच्या सेवेची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला. यामुळे पुरस्काराचा मान वाढल्याचे पत्रकार शेखर पाटील यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले . यावेळी माजी नगरसेविका लता पाटील, दीपिका ठाकूर, पुष्पा म्हात्रे ,आनंदनगरचे रहिवासी उपस्थित होते .

# सामाजिक कार्यकर्ते राजू मुंबईकर यांच्यातर्फे होळीनिमित्त आदिवासी बांधवाना अन्नधान्य वाटप.

**दैनिक वादळ वार्ता**
**उरण/विठ्ठल ममताबादे**
स्वतः साठी तर सगळेच जगतात आयुष्यात दुसऱ्यांसाठी पण जगत राहावं ! आपल्या ताटातील भाकरीचा तुकडा एखाद्या भुकेल्या गरजूवंतांच्या मुखी घालून पहावं ! गरीब -श्रीमंत, उच्च -निच्चतेचे भेदभाव विसरून बंधूभावनेनं प्रेमाच्या रंगात न्हाऊंन निघण्याचा आणि माणुसकीच्या संस्कारातून रुजलेल्या गोड पोळीचा सण म्हणजे होळीचा सण आणि ह्याच अविट - गोड सणात आपल्या बाळ-गोपाळांसोबत आपला पण सण आनंदात साजरा व्हावा या विचारांच्यां विवंचनेत असणाऱ्या वाडी - वस्ती वरील आदिवासी बांधवांनां ह्या महागाईच्या काळात आपल्या संसाराचा गाडा चालवताना जीव मेटाकुटीला येत असतो. अश्यातच आदिवासी बांधवांनां आपण सण साजरे तरी कसे करायचे ? ह्या प्रश्नाचं काहूर त्यांच्या मनाला सतावतं असतो ! पण असं पण एक व्यक्तिमत्त्व आहे ! जे आदिवासी बांधवांकरिता सदैव आशेचा किरण बनून उभा असतो.त्यांची दिवाळी, त्यांची होळी आनंदात साजरी व्हावी ,गोड व्हावी या करीता दरवर्षी त्यांचे प्रत्येक सण उत्सव आनंदात साजरे करायला मदत करनारा,प्रत्येक संकट समयी मदतीचा हात पुढे करणारा,त्यांच्या मदतीला धावून जाणारा त्यांच्या जीवाचा मैतोर अर्थात महाराष्ट्र भूषण राजू मुंबईकर यांनी या हि वर्षी आपल्या मनाच्या मोठेपणाचं दर्शन घडवत रानसई येथील खोंड्याची वाडी,मार्गाची वाडी,भुर्याची वाडी,बंगल्याची वाडी, खैरकाठी,सागाची वाडी ,केळ्याचा माळ,वेश्वी आदिवासीं वाडी ह्या सर्व आदिवासी वाड्यांवरील बांधवांच्यां कुटुंबाची होळी आनंदीत व्हावी म्हणून त्यांना ह्या वर्षी तब्बल २५० ( अडीचशे किलो ),चणे - हरभरे प्रत्येक वाडीवर तीस किलो,पंचवीस किलो या प्रमाणे वाटप केले.



प्रत्येकाच्या जीवनात आनंदाचा रंग भरणारा रंगोत्सव म्हणजेच शिमगोत्सव आणि याच उत्सवाला अनादी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा केअर ऑफ नेचर या सामाजिक संस्थेचे संस्थापक सदस्य राजू मुंबईकर यांनी रानसई येथील सर्व आदिवासी वाड्यांवरील आदिवासी बांधवांनां होळीच्या सणा निमित्त प्रेमाची भेट देऊन त्यांना भरल्या मनाने शुभेच्छा देखील दिल्या.त्यांच्या सोबत ह्या आनंददायी रंगोत्सवाच्या क्षणी केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्राध्यापक स्नेहल पालकर,केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे वेश्वी शाखा उपाध्यक्ष सुरेंद्रजी पाटील,आगरी कोळी कराडी संघर्ष सामाजिक संस्थेचे उरण तालुका सचिव अनिल घरत व केअर ऑफ नेचर संस्थेचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.होळी सणाच्या निमित्ताने राजू मुंबईकर यांनी या आदिवासीं बांधवां करिता दिलेली ही प्रेमाची आणि आपुलकीची भेंट मिळाल्यावर त्या आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावरचा तो ओसंडून वाहणारा आनंद आणि त्यांच्या डोळ्यांतील ते आपुलकीचे निरागस आनंदी भाव पाहून खरचं होळी सणाचा आनंद खऱ्या अर्थाने द्विगुणित झाला आणि होळीच्या भावनिक रंगात न्हाऊन गेला.असंच म्हणावे लागेल.

# नेकनूर ग्रामपंचायतच्या वतीने पाण्याचे टँकर सुरु



**दैनिक वादळ वार्ता**
**नेकनूर /शेख शाकेर**
नेकनूर शहरासाठी ग्रामपंचायतच्या वतीने शासनामार्फत पाणी टँकर सुरु करण्यात आले. या प्रसंगी ग्रामसेवक दत्ता नागरे.सरपंच सुंदर लांडगे, ग्रामपंचायत विरोधी पक्षनेता राजा भैय्या उपसरपंच सचीन शिंदे,ग्रामपंचायत सदस्य सय्यद रहीम .ग्रामपंचायत सदस्य सय्यद रिजवान. ग्रामपंचायत सदस्य सय्यद बबलू.टँकर चालक व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्तिथ होते मराठवाड्यात यंदा अपेक्षित पाऊस झाला नसल्याने पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. अनेक ठिकाणी विहीर आणि बोअरवेलचे पाणी अटले असून, मराठवाड्यात सध्या फक्त २३ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती समोर येत आहे. अनेक महत्वाच्या प्रकल्पात देखील पाणीसाठा कमी झाला असून, काही प्रकल्प कोरडेठाक पडले आहेत. त्यामुळे आगामी काळात भीषण पाणी टंचाईचा मराठवाड्याला सामना करावा लागण्याची शक्यता आहे.विशेष मराठवाड्याची तहान भागवणाऱ्या नेकनूर धरणात फक्त ९ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. ग्रामपंचायत वतीने नेकनूर मध्ये ६ टँकर उपलब्ध करून दिले आहे, वॉर्ड नंबर ३ मधून विरोधी पक्षनेता राजा भैय्या, सय्यद रिजवान, नदीम मंडोला वार्ड ५ मधून मुजीब अतार ,स्वतःहून आपल्या वार्ड मधून पाण्याचा प्रश्न मिटवायला लागले आहे,नेकनूर गावामधून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे

# राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित राजाभाऊ कांबळे यांचा पंचशील विहार जयभीम नगर येथे सत्कार

**वादळवार्ता/बीड**
राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित राजाभाऊ संभाजी कांबळे सरांचा पंचशील विहार जयभीम नगर येथे भव्य सत्कार करण्यात आला. रविवारची नियमीत सामुहीक बुध्द वंदना घेण्यात आली. त्यापूर्वी आदर्शांच्या प्रतिमांना विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती समिती २०२४ ची नवनिर्वाचित कार्य समितीचे पदाधिकारी आदरणीय आयु. विष्णू कसबे सर, उपाध्यक्ष आदरणीय आयु. लालासाहेब हातागळे साहेब, सचिव आदरणीय आयु. भाऊसाहेब कांबळे सर कोषाध्यक्ष आदरणीय आयु. धनराज वाव्हळ सर यांनी पुष्पहार अर्पण करुन सुगंधित दीप-धुपाने पुजन करून अभिवादन केले. यानंतर सामुहीक तिसरन ‘पंचशील ग्रहण केले.

जयभीम नगरचे जेष्ठ मार्गदर्शक आदरणीय आयु. प्रा. पी. वाय फुलवरे सर, आयु. ज्ञानोबा रोकडे (नाना) आदरणीय इंजि. आयु अच्युतराव



जोगदंड साहेब, आदरणीय आयु. प्राचार्य डॉ. मधुकर खळगे सर याच्या हस्ते पद्मपानी प्रतिष्ठान, बीड याच्या वतीने देण्यात येणारा राज्य स्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त आयु. राजाभाऊ क़ांबळे सर यांचा उपरोक्त मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व पुष्पहार देऊन यथोचित स्वागत सत्कार करण्यात आला त्याचबरोबर नवनियुक्त २०२४ च्या जयंती समिती कार्यकारिणीचाही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करुन यशस्वीपणे जयंती उत्सव साजरा करण्यासाठी सद्दीच्छा व सहकार्याचे पाठबळ देऊन उत्साह द्विगुणित केला. सत्काराला उत्तर म्हणून आदर्श शिक्षक आयु. राजाभाऊ कांबळे सर यांनी सर्व जयभीम नगरचे व कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त करतांना म्हणाले, यापूर्वीही मला दोन वेळा अशाच प्रकारे राज स्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. हा माझ्या आयुष्यातील तिसरा पुरस्कार आहे. खरं पाहीलं तर या पुरस्काराने माझे प्रतिनिधिक कार्य अधोरेखित केले आहे परंतु आपण सर्वच आपापल्या ठिकाणी प्रचंड संघर्षातून व कठोर परिश्रमातून वाटचाल करीत असतो आणि हा फक्त मला वैयक्तिक आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे असे न समजता इथे बसलेल्या व आपापल्या क्षेत्रात प्रामाणिकपणे कार्य करणार्या कार्यकुशल व्यक्तिमत्वाचा हा मानसन्मान आहे असे समजतो.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आयु. धनराज वाव्हळ सर यांनी केले तर कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन आदरणीय इंजि. आयु. अच्युतराव जोगदंड साहेबांनी केले. कार्यक्रमाचे शेवटी सामुहीक सरणणतय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
# वादळ वार्ता




केज येथे धुलीवंद प्राध्यापक व्यावसायिक यांच्यामध्ये हर्ष उल्लासाच्या वातावरणामध्ये एकमेकास वेगवेगळे रंग लावून साजरी करण्यात आला प्रसंगी व्यावसायिक व प्राध्यापक

# धक्कादायक घटना, होळीचा रंग झाला बेरंग, खदाणीत बुडून दोघा जणांचा मृत्यू

**वादळवार्ता/मुंबई**

मुंबई : होळी आणि धुळवड राज्यभर साजरी केली जात असताना मुंबईतील उपनगरी दहीसर येथील एका खाजगी जागेतील खदानीत उतरलेल्या दोघा जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. दहीसरच्या हनुमान टेकडी, अशोकवन परिसरातील जय महाराष्ट्र खदान येथे दोन जण खदानीच्या पाण्यात उतरले. त्यांना पोहता येत नसल्याने पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने ते बुडाले असल्याचे म्हटले जात आहे. या घटनेची खबर मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी त्यांच्या बचावासाठी प्रयत्न केला. परंतू त्यात त्यांना यश आले नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

मुंबईसह राज्यात होळी आणि धुळवडीचा सण साजरा होत असताना मुंबईचे पश्चिम उपनगर असलेल्या दहीसर परिसरातील एका खदानीत सोमवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास दुर्दैवी घटना घडली आहे. येथील सुरज पटेल मार्ग, हनुमान टेकडी, अशोक वन परिसरातील जय महाराष्ट्र खदानीत दोन जण पाण्यात उतरले होते. पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने ते बुडू लागले. त्यांन मदतीसाठी धावा घेतला. त्यांचा आवाज ऐकून त्या परिसरातील नागरीकांनी पोलिसांना कळविले. त्यानंतर अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी रवाना झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी रस्सी आणि इतर साहीत्याच्या मदतीने आधी एकाला बाहेर काढले. मनोज रामचंद्र सुर्वे ( 45 ) तसेच चिंतामणी वारंग ( 43 ) अशा दोघांना 108 एम्ब्युलन्सने शताब्दी रुग्णालयात नेण्यात आले तेथे डॉक्टरांनी दोघांना तपासून मृत घोषीत केले आहे.

होळी आणि धुळवडीच्या निमित्ताने अनेक जण समुद्रात किंवा खदानीत मौजमस्ती करण्यासाठी जीव धोक्यात घालून उतरत असतात. त्यात दरवर्षी मनुष्यहानीच्या घटना घडत असतात. दहीसरच्या घटनेने आता पुन्हा बेकायदेशीर खदानीचा प्रश्न उपस्थित झाला आहे. या परिसरातीस अशा धोकादायक ठिकाणांचे प्रवेश बंद करायला हवेत अशी मागणी होत आहे.



## कीर्तनकारांनी ५ हजार जास्त घेतले की: इदुरीकर महाराजानी असे घेतले फैलावर

**वादळवार्ता/प्रतिनिधी** सध्या उन्हासोबतच लोकसभा निवडणुकीचे वातावरण पण तापू लागले आहे. जागा वाटपाचे एकदा फायनल झाल्यावर प्रचाराला जोर चढणार आहे. गेल्या दोन वर्षांपासून दावे-प्रतिदावे, डावपेच राज्यातील अवघी जनता पाहत आहे. पण राजकीय धुराळा उठण्यापूर्वीच इंदुरीकर महाराजांनी राजकीय सभांवर निशाणा साधल्याने सर्वांचेच



कान टवकारले आहेत. अर्थात इंदुरीकर महाराजांनी कोणत्याही राजकीय पक्षावर टीका केलेली नाही. पण आरसा मात्र दाखवला आहे. काय म्हणाले इंदुरीकर महाराज?


इंदुरीकर महाराजांची राजकीय सभांवर जोरदार टीका

इंदुरीकर महाराज चिमटे काढत वैगुण्य आणि समाजातील वाईट वृत्तीवर तुटून पडतात. त्यांच्या अनेक किर्तनात सध्या समाजात सुरु असलेल्या अनेक विचित्र प्रकारांचा खरपूस समाचार घेतात. यावेळी मात्र त्यांनी राजकीय सभांवर निशाणा साधला. कीर्तनकारांनी ५ हजार रुपये जादा घेतले तर धंदा मांडला अशी टीका होते.मात्र राजकीय सभांना ५ कोटींचा खर्च केला जातो.त्याचे काय? असा रोकडा सवाल त्यांनी केला. त्यांचा रोख कुणावर आहे हे वेगळं सांगायला नको, नाही का?

## मुंबई, पुणे एक्स्प्रेस वे वर तीन वाहनांचा विचित्र अपघात, दुधाचे टँकर कलंडले

**दैनिक वादळ वार्ता विदर्भात**

मुंबई, पुणे एक्स्प्रेस वे वरुन रोज हजारो वाहने जात असतात. शनिवार, रविवार आणि सुट्टीच्या दिवशी पुणे-मुंबई एक्स्प्रेस वेवर वाहतूक कोंडी होत असते. आता रविवारी या महामार्गावर तीन वाहनांचा भीषण अपघात झाला. या अपघातात दूधाचे टँकर होते. त्यामुळे टँकरमधील दूध रस्त्यावर पसरले. अपघातात दुधाच्या टँकरचा चालक ठार झाला. दुपारी बारा वाजेच्या सुमारास हा अपघात



झाला. या अपघातामध्ये कारचा चक्काचूर झाला. परंतु सुदैव चांगले होते, कारमधील दोघे जण बचावले. पोलिसांनी त्वरीत घटनास्थळी गाठले. त्यानंतर जखमींना रुग्णालयात पाठवले आणि अपघातग्रस्त वाहनांना बाजुला केले.

कसा झाला अपघात

पुण्याहून मुंबईकडे दूध टँकर जात होते. यावेळी खोपोली हद्दीत बोर घाट उतरताना टँकर चालकाने लेन बदली. यामुळे टँकर अचानक कलंडले. त्याचवेळी हे टँकर कारवर समोरील बाजूला आदळले. त्यानंतर समोर जाणाऱ्या ट्रकला जोरदार धडक दिली. यामुळे रस्त्यावर सर्व दूध सांडले. यामुळे सुटीच्या दिवशी वाहतूक कोंडी निर्माण होणाऱ्या या मार्गावर पुन्हा वाहतूक कोंडी निर्माण झाली. अपघातामुळे बराच वेळ वाहतूक बंद होती. अपघातात दूध टँकरचा चालक ठार तर कारमधील दोघे प्रवासी बचावले.

## माहीम बीचवर पाच कॉलेज तरुण बुडाले, तीन जणांना वाचविण्यात यश, दोघांचा मृत्यू

**वादळवार्ता/प्रतिनिधी**

माहीम : होळी आणि रंगपंचमीचा सण सर्वत्र साजरा होत असताना माहीम बीचवर पाच कॉलेजचे तरुण पाण्यात बुडाल्याची घटना सोमवारी दुपारी घडली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने यातील चौघा तरुणांना पाण्याबाहेर काढले. त्यातील तीन तरुणांना जीवनदान मिळाले तर दोन तरुणाचा मृत्यू झाला आहे. तर दुसऱ्या एका अन्य घटनेत दहीसर येथील हनुमान टेकडी परिसरात खदाणीत पोहायला गेलेल्या दोघा जणांचा मृत्यू झाला आहे.



होळी आणि धुळवडीच्या आनंदाला मुंबईत गालबोट लागले आहे. दादर जवळील माहीम बीचवर समुद्राच्या पाण्यात खेळायला उतरलेले कॉलेजचे तरुण दुपारी चारच्या सुमारास पाण्यात उतरले. वडापाव खाल्यानंतर या तरुणांनी समुद्राच्या पाण्याचा आनंद घेण्याचा प्रयत्न केला. परंतू पाण्याचा अंदाज न आल्याने या चार तरुण गंटागंळ्या खाऊ लागले. त्यामुळे अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी पाच तरुणांपैकी चौघांना पाण्याबाहेर काढले. त्यातील दोघांना डॉक्टरांनी तपासून घरी सोडले. तर दोघांवर हिंदूजा रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

ओम लोट ( 16 ) हा दहावीचा विद्यार्थी आयसीयुत आहे, तर हर्ष किंजले ( 19 ) या 14 वीच्या विद्यार्थ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तर यश कागडा ( 16 ) हा अकरावीचा विद्यार्थी मिसिंग असून त्याचा शोध सुरु आहे. दुपारी साडे तीन वाजता वडापाव खायाला येथे आले होते. त्यानंतर ते समुद्रात मौजमस्ती करायला उतरल्यानंतर काही वेळातच लाटांचा अंदाज न आल्याने ते बुडाले. परंतू अग्निशमन दलामुळे पाच तरुणांपैकी तीन जणांना वाचविण्यात यश आले. एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला तर एक जण बेपत्ता आहे. यश कागडा नावाचा तरुण अद्यापही बेपत्ता आहे. त्याला शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र यश मिळालेले नाही. अंधार पडल्याने आता शोध मोहीम बंद करण्यात आली आहे. मात्र उद्या सकाळी पुन्हा शोध मोहीम शुरू करण्यात येणार आहे. कोणताही सण साजरा करताना अतिउत्साह दाखवू नये जीवाची काळजी घ्यावी असे आवाहन माहीम पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बिलाल शेख यांनी केले आहे.

# लेकीला उमेदवारी न दिल्याने विजय वडेट्टीवार नाराज ? ; म्हणाले, दिल्लीला हादरे

**वादळवार्ता/माजलगाव :**

प्रतिभा धानोरकर आणि शिवानी वडेट्टीवार यापैकी कुणाला तिकीट मिळणार याची राजकीय वर्तुळात चर्चा होती. याचं उत्तर अखेर मिळालं आहे. काल संध्याकाळी काँग्रेसने लोकसभेच्या उमेदवारांची यादी जाहीर केली. प्रतिभा धानोरकर यांना चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाच्या काँग्रेसच्या उमेदवार असतील. प्रतिभा या दिवंगत काँग्रेस नेते बाळू धानोरकर यांच्या पत्नी आहेत. विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार हे त्यांची कन्या शिवानी वडेट्टीवार यांना लोकसभेची उमेदवारी मिळावी, यासाठी आग्रही होते. मात्र प्रतिभा धानोरकर यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर विजय वडेट्टीवार नाराज असल्याची चर्चा होते आहे.

धानोरकर यांच्या उमेदवारीवर वडेट्टीवार म्हणाले...

विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी चंद्रपूरच्या उमेदवारीवरही भाष्य केलं आहे. पक्षाने जो निर्णय घेतला तो मान्य आहे. शिवानीने उमेदवारी मागितली होती. पण ती दिली गेली नाही. मला शक्य असेल तिथे प्रचारासाठी जाईल. मी काँग्रेसचा नेता आहे. मला महाराष्ट्रभर काम करायचं संकटाच्या वेळेस महाराष्ट्र उभा राहिला आहे.दिल्लीच्या हादरे देण्याची हिंमत आणि शक्ती या महाराष्ट्रामध्ये आहे, असं वडेट्टीवार म्हणाले.






प्रतिभा धानोरकर गडबडी मध्ये माझं नाव विसरले असतील. नावामुळे फार काही फरक पडत नाही नाव घेतलं पाहिजे असं काही नाही. पाचही ठिकाणी माझा वाटा असतो. जिथे जिथे माझी गरज असेल तिथे तिथे मी जाईल, असं वडेट्टीवार यांनी स्पष्ट केलं.

विरोधकांना टोला

काही लोकांना सत्तेमुळे शहाणपण सुचलाय. तो उशिरा सुचतो. लोकसभेची उमेदवारी गळयात पडल्याबरोबर त्याला काँग्रेसची हुकूमशाही दिसते. तर मला असं वाटतं की घोडा पुढे दौडत असताना घोड्याचा आवाज गाढव काढतोय आणि स्वतःला घोडा समजतो आहे असं तो प्रकार दिसतोय, असं म्हणत वडेट्टीवार यांनी विरोधकांना टोला लगावला आहे.

काँग्रेस जिंकणारच- वडेट्टीवार

पुरोगामी विचाराला घेऊन चालणारा विदर्भ हा कायम काँग्रेस सोबत राहिलेला आहे. संकटाच्या वेळेस सुद्धा काँग्रेसला विदर्भातील प्रचंड अशी साथ दिली आहे. विदर्भातील पहिल्या टप्प्यातील पाचही लढती काँग्रेससाठी अनुकूल आहेत. चारही ठिकाणी भाजप बरोबर लढत आहे. विदर्भातील पूर्व जनतेने मनात ठरवलेला आहे,यावेळेस काँग्रेसला जिंकून द्यायचं आणि या पाचही लोकसभा क्षेत्रामध्ये काँग्रेस प्रचंड मताने विजयी झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )